# शेतकरी, विक्रेत्यांना एकत्र आणणारा अनोखा 'डिजिटल प्लॅटफॉर्म' सादर

पुणे, ता. १६ : भाज्या, फळे आणि डाळींच्या उपलब्धतेबद्दल व त्यांच्या किंमतीविषयी माहिती देणारा; तसेच शेतातून टेबलापर्यंत आणण्यासाठी पडणारा आर्थिक ताण कमी करणारा एक अनोखा डिजिटल प्लॅटफॉर्म येथील मायविश्व टेक्नोलॉजीज्तर्फे सादर करण्यात आला आहे. हा प्लॅटफॉर्म शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची सोय होणार असून, त्यांना किरकोळ, घाऊक विक्रेते किंवा मोठ्या संस्था; तसेच सोसायट्यांच्या गरजा समजतील व ते त्याप्रमाणे प्रतिसाद देऊ शकतील. हा डिजिटल प्लॅटफॉर्म शेतकऱ्यांना त्यांच्या विक्रीयोग्य वस्तूंची यादी संभाव्य ग्राहकांसाठी प्लॅटफॉर्मवर 'पोस्ट' करण्यास मदत करेल; तसेच ग्राहकांनादेखील त्यांची खरेदीची यादी संभाव्य विक्रेत्यांसाठी 'पोस्ट' करता येईल, असे मायविश्व टेक्नॉलॉजीजचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर यांनी सांगितले.